॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३३३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

✻ सुविचार ✻
जीवन हे फुल आहे आणि प्रेम हा त्या फुलातील मध आहे.

# महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर

## मोदी सरकारला धक्का । २९८ सदस्यांचे मतदान विधेयकाच्या बाजुने तर २३० सदस्यांचे मतदान विरोधात

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**
नारी शक्ती वंदन अधिनियम (१३१ वी घटनादुरुस्ती) आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर देशाच्या संसदेत काल जोरदार चर्चा झाली. त्यानंतर शुक्रवारीही सत्ताधारी आणि विरोधी बाकावरील सदस्यांनी या विधेयकावर मते मांडली. त्यानंतर शुक्रवारी सायंकाळी यावर मतदान पार पडले. यावेळी एकूण ५२८ सदस्यांनी मतदान केले. यापैकी २९८ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने तर २३० सदस्यांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केले. घटनादुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता असते. मात्र, विरोधात जास्त मतदान झाल्याने हे विधेयक नामूंजर झाले. त्यामुळे मोदी सरकारची अक्षरश: फटफजिती झाली. यामुळे मोदी सरकारवर अन्य २ विधेयके मागे घेण्याची नामुष्की ओढवली. या सरकारला १२ वर्षांत पहिल्यांदाच मोठा धक्का बसला आहे.

लोकसभेत शुक्रवारी सायंकाळी महिला आरक्षण दुरुस्ती विधेयक आणि डिलिमिटेशन विधेयकावर मतदान पार पडले. या विधेयकांच्या बाजूने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सत्ताधारी पक्षातील विविध नेत्यांनी भूमिका मांडली तर विरोधी पक्षांकडून अखिलेश यादव, प्रियंका गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अरविंद सावंत, अमोल कोल्हे, वर्षा गायकवाड, कल्याण बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांनी बाजू मांडली. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्याने मंजूर करण्यासाठी लोकसभेतील उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मते आवश्यक असतात.



लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आले. घटनादुरुस्तीच्या बाजूने पहिल्या फेरीत २९८ मतदान झाले तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात २३० मते नोंदवली गेली. एकूण ५२८ खासदारांनी मतदानं केले. आता राज्यसभेत उद्या मतदान होणार आहे. ५२८ चे दोन तृतीयांश ३५२ होते. एवढे मतदान मिळविण्यात सरकारला अपयश आले. त्यामुळे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक २०२६ नामंजूर झाल्याचे जाहीर केले. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी इतर दोन विधेयके पुढेन नेण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान, केंद्र सरकारने महिला आरक्षण विधेयकासोबत परिसीमन विधेयक आणल्याने विरोधी पक्षांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी सरकारने आणलेल्या विधेयकावर बोलताना यापूर्वी महिला आरक्षण विधेयकाला सध्याच्या सत्ताधा-यांनी विरोध केल्याचे म्हटले होते. तसेच महिला आरक्षण लोकसभा आणि विधानसभेत लागू करायचे असेल तर ५४३ जागांमध्येच अंमलबजावणी करावी, अशी भूमिका प्रियंका गांधी यांनी मांडली. घटना दुरुस्ती विधेयकात महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद होती. तसेच २०११ च्या जनगणनेच्या आधारावर डिलिमिटेशन केल्यानंतर २०२९ च्या संसदीय निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण कायदा लागू करण्यासाठी लोकसभेतील जागांची संख्या विद्यमान ५४३ वरून वाढवून कमाल ८५० पर्यंत नेण्याचा प्रस्ताव होता. त्यामुळे याला विरोधकांनी विरोध केला. अखेर लोकसभेत हे विधेयकच नामंजूर झाले.

### एक तृतीयांश बहुमत मिळविण्यास अपयश

■ भारतीय संविधानातील कलम ३६८ नुसार घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहात (लोकसभा आणि राज्यसभा) विशेष बहुमताची आवश्यकता असते. विधेयक मंजुरीसाठी प्रत्येक सभागृहातील एकूण सदस्यसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त सदस्य हजर असणे आवश्यक आहे. यानंतर मतदान करणा-या सदस्यांपैकी किमान दोन-तृतीयांश मते विधेयकाच्या बाजूने मिळाल्यास हे विधेयक मंजूर होते. मात्र, मोदी सरकारला बहुमत मिळविण्यास अपयश आले.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### फेटाळणी

सभागृहाने फेटाळता
नाचक्की तर झाली
हवेतले नेतृत्व आता
येईल बहुतेक खाली
सत्तेमध्ये हवे एखादे
शहाणपणाचे कलम
अधिनियम दुरुस्तीला जे
सहमतीचा लावेल मलम

## SPOT NEWS

### शिवनिका ट्रस्टचे संचालक जितेंद्र शेळके यांचा अपघाती मृत्यू

**● मुंबई –** भोंदू अशोक खरातच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉक्टर जितेंद्र शेळके यांचा आज अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या कारने समृद्धी महामार्गावर उभ्या असणा-या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके यांच्यासह त्यांच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला. यासंबंधीच्या माहितीनुसार, जितेंद्र शेळके आज दुपारी १ च्या सुमारास आपल्या कुटुंबासह छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात होते. रस्त्यात समृद्धी महामार्गावरील धोत्रे गावालगत त्यांच्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की, त्यांची कार थेट कंटेनरखाली घुसली. त्यामुळे तिचा अक्षरश: चुराडा झाला. पोलिस व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन जितेंद्र शेळके, त्यांची पत्नी अनुराधा व मुलाला कारमधून बाहेर काढले. पण तोपर्यंत जितेंद्र शेळक व त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला होता.

### राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची

**● मुंबई –** मराठी भाषेबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या सर्व माध्यम आणि मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची केली जाणार आहे. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषेचे अध्यापन आणि अध्ययनाची सक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कारवाई देखील केले जाणार आहे. नियम मोडणाऱ्या शाळांवर १ लाख रुपयांपर्यंत दंड आकारला जाणार आहे.

## महिला व बाल विकास योजनांत अहिल्यानगर आघाडीवर

### बाल संगोपन योजनेत राज्यात सर्वाधिक लाभार्थी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अहिल्यानगर जिल्हा राज्यात आघाडीवर असून, 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेत' सर्वाधिक लाभार्थी जिल्ह्यात आहेत. सन २०२४-२५ मध्ये ७ हजार १२३ लाभार्थ्यांना १९ कोटी २३ लाख २१ हजार रुपयांचे वितरण करण्यात आले, तर सन २०२५-२६ मध्ये १० हजार १११ लाभार्थ्यांना आतापर्यंत ४ कोटी ५४ लाख ९९ हजार ५०० रुपये वितरित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय कदम यांनी दिली.

केंद्र शासनाच्या प्रतिपालकत्व व प्रायोजकत्व योजनेंतर्गत कोविड-१९ काळात पालक गमावलेल्या मुलांना आधार देण्यात आला असून, एकूण १ हजार ५२१ मुलांना ५ कोटी ४७ लाख ५६ हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. जिल्ह्यात अनाथ प्रमाणपत्राच्या माध्यमातून ५४६ मुलांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले असून, त्यापैकी १५ मुलांना शासकीय नोकरी मिळाली आहे.

बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. २७ नोव्हेंबर ते ८ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या अभियानादरम्यान प्रभावी जनजागृती व कृतीमुळे हे यश संपादन झाले. मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत कार्यरत चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) द्वारे २४ तास सेवा उपलब्ध करून दिली जात असून, मागील वर्षभरात ४८ बालविवाह रोखण्यात यश आले आहे.

महिला व बाल विकास विभागाच्या १३ कार्यालयांसाठी 'अहिल्या भवन' उभारणीस १५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली असून, पुढील एक ते दीड वर्षांत इमारत पूर्ण होण्याची शक्यता आहे. या इमारतीत सर्व कार्यालये एकाच छताखाली उपलब्ध होऊन नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सेवा मिळणार आहेत. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत जिल्ह्यात ११ लाख ३९ हजार लाभार्थ्यांना फेब्रुवारीपर्यंत लाभ वितरित करण्यात आला आहे.

जिल्ह्यात 'सखी वन स्टॉप सेंटर' व 'महिला सक्षमीकरण केंद्र' कार्यरत असून, जिल्हा रुग्णालय परिसरात सखी केंद्राची प्रशस्त इमारत आहे. संगमनेर येथे शक्ती सदन व सखी केंद्र सुरू असून अडचणीत आलेल्या महिलांना मदत दिली जाते. तसेच पिंक ई-रिक्शा योजनेद्वारे गरजू महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात मदत केली जात आहे.

## उष्णतेमुळे शाळा सकाळी ७ ते ११ यावेळेत भरणार



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. दि. १८ एप्रिल २०२६ पासून उन्हाळी सुट्टीपर्यंत शाळा सकाळी ७ ते ११ या वेळेत भरतील, असा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी दिला आहे.

भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यासाठी उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी केला आहे. उष्माघाताचे दुष्परिणाम टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत हा आदेश देण्यात आला असून, शाळांनी व्यवस्थापन समितीची मंजुरी घेऊन अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित निर्णयाची माहिती सर्व मुख्याध्यापकांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

शिक्षकांनी परीक्षेचे कामकाज पूर्ण करण्यासाठी सकाळी ७ ते १२ या वेळेत शाळेत उपस्थित राहणे आवश्यक राहील.

# अक्षयतृतीया पार्श्वभूमीवर बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सज्ज

## बालविवाह रोखण्यासाठी सर्वांनी सतर्क राहावे : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने विशेष सतर्कता बाळगण्यास सुरुवात केली असून, कुठेही बालविवाह होऊ नयेत यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

अक्षयतृतीया हा सण विवाहासाठी शुभ मानला जात असल्याने या दिवशी सामूहिक तसेच एकल विवाह सोहळ्यांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाते. या पार्श्वभूमीवर बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार मुलांचे किमान वय २१ वर्षे, तर मुलींचे किमान वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. या वयोमर्यादेपेक्षा कमी वयात विवाह केल्यास तो बालविवाह ठरून बेकायदेशीर मानला जातो. अशा प्रकरणांमध्ये संबंधित पालक, नातेवाईक, आयोजक तसेच विवाह सोहळ्यात सहभागी असलेल्या सर्व संबंधितांवर गुन्हा दाखल करून कठोर




कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या गुन्ह्यासाठी दंड व कारावासाची तरतूद आहे.

शासनाच्या अधिसूचनेनुसार ग्रामीण भागात ग्रामसेवकांची बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून अंगणवाडी सेविका सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना प्रतिबंध अधिकारी, तर मुख्यसेविकांना सहाय्यक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

बालविवाह रोखण्यासाठी मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे, मंगल कार्यालये, बँडपथके, डीजे, केटरर्स, फोटोग्राफर तसेच विवाह विधी करणारे धर्मगुरूंनी बालविवाहास कोणत्याही प्रकारे सहकार्य करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित यंत्रणांनी अशा ठिकाणी विशेष लक्ष ठेवून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

अक्षयतृतीया तसेच वर्षभर कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ चाइल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस हेल्पलाईन ११२ या टोल-फ्री क्रमांकावर कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहकार्य करावे, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी नमूद केले.

## SPOT NEWS

### वनपट्टाधारक शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी विनामूल्य नोंदणी मोहीम सुरू

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

वनपट्टाधारक शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळावा यासाठी फार्मर आयडी नोंदणीची विशेष मोहीम राज्यभर सुरू करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी अनिवार्य करण्यात आली असून नोंदणी पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे सर्व पात्र वनपट्टाधारक शेतकऱ्यांनी त्वरित नोंदणी करावी, असे आवाहन महसूल उपजिल्हाधिकारी शारदा जाधव यांनी केले आहे. डिजिटल कृषी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अॅग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांची माहिती एकत्रित करून त्यांना विविध योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा यासाठी फार्मर आयडी नोंदणीला प्राधान्य देण्यात आले आहे. वनहक्क अधिनियम २००६ अंतर्गत अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी समुदायांना त्यांच्या वनजमिनीवरील हक्क प्रदान करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील वनपट्टाधारक शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यासाठी ही विशेष नोंदणी मोहीम राबविण्यात येत आहे. वनपट्टाधारक शेतकऱ्यांनी आपल्या जवळील नागरिक सुविधा केंद्रात आवश्यक कागदपत्रांसह भेट देऊन नोंदणी करून घ्यावी. नोंदणी झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या विविध योजना, अनुदान, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती सहाय्य व इतर डिजिटल कृषी सेवांचा लाभ सुलभपणे मिळण्यास मदत होणार आहे.

### मंथन परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे १२४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेने राज्यस्तरीय मंथन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप उमटवली आहे. शाळेतील तब्बल १२४ विद्यार्थ्यांनी विविध स्तरांवरील गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. यामध्ये ३ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत, ३२ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत, तर ८९ विद्यार्थ्यांनी केंद्र गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत इयत्ता दुसरीतील ओजस्वी स्वप्निल भोरे व आयुष योगेश गंभीरे यांनी द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच इयत्ता चौथीतील आस्था निलेश सुंबे हिने राज्यात पाचवा क्रमांक पटकावत शाळेचा गौरव वाढविला आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा स्कूल कमिटी सदस्य अर्जुनराव पोकळे व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांच्या हस्ते शाळेत विशेष सत्कार करून गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, संस्थेचे लाइफ मेंबर सदस्य शिवाजीराव लंके, प्राचार्य छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्यासह पालक संघ व शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, शितल रोहकले, जयश्री खांदोडे, सोनाली अनुभुले, रूपाली वाबळे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, इंदुमती दरेकर, कांचन मदने, पुनम धाडगे व रूपाली पांडुळे यांनी मार्गदर्शन करून परीक्षेची तयारी करून घेतली होती. या विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# कोपरगाव मतदारसंघात नाला खोलीकरणाच्या कामांना वेग

## आ. आशुतोष काळे । जलयुक्त शिवार उपक्रमांतर्गत ४७ गावांची निवड; कोपरगावातील १८ गावांतील कामे पूर्ण

**कोपरगाव । वीरभूमी -**

जलयुक्त शिवार उपक्रमांतर्गत आर्ट ऑफ लिव्हिंग व मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने कामे राबवली जात आहेत. या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव व राहाता तालुक्यातील एकूण ४७ गावांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये कोपरगाव तालुक्यातील २३ व राहाता तालुक्यातील २४ गावांचा समावेश आहे. कोपरगाव तालुक्यातील १८ गावांमध्ये जलयुक्त शिवारची कामे पूर्ण झाली असून उर्वरित गावांमध्ये कामांना वेग आला आहे. मे अखेरपर्यंत सर्व कामे पूर्ण होतील, अशी माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली.

या उपक्रमांतर्गत माहेगाव देशमुख येथील मुख्य नाल्याचे खोलीकरण व गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ शुक्रवार (दि. १७) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आला.

गाव पाणीदार करण्यासाठी आणि संभाव्य पूर परिस्थिती टाळण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग व महाराष्ट्र शासन यांच्या जलयुक्त शिवार योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात २०२३ पासून कोपरगाव तालुक्यातील निवड झालेल्या २३ गावांमध्ये सातत्याने नाले खोलीकरणाची कामे सुरू आहेत. आतापर्यंत खिर्डी गणेश, बोलकी, सडे, कोकमठाण, रवंदे, मुर्शतपूर, शिंगणापूर, सांगवी भुसार, माळेगाव थडी, ब्राम्हणगाव, टाकळी, सुरेगाव, कोळपेवाडी आणि नाटेगाव या १८ गावांमध्ये कामे यशस्वीरित्या पूर्ण झाली आहेत.



या गावांमध्ये नाल्यांमधील साचलेली माती, झाडे व झुडपे काढल्यामुळे नाल्यांची पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढली असून नैसर्गिक पाण्याचे स्रोत मोकळे झाले आहेत. सध्या धारणगाव, करंजी बु., संवत्सर व माहेगाव देशमुख येथे कामे प्रगतीपथावर असून चासनळी, चांदगव्हाण, जेऊर पाटोदा, सोनारी व येसगाव येथे मे अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

या योजनेमुळे अनेक बुजलेल्या नाल्यांचा व चराचा श्वास मोकळा झाला आहे. पूर्वी पावसाळ्यात पाण्याचा निचरा न झाल्याने शेतात पाणी साचून पिकांचे नुकसान होत होते. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती. मात्र आता नाल्यांचे खोलीकरण झाल्याने अतिरिक्त पाणी शेतात साचणार नाही.

नाले खोलीकरणामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होईल. पाणीटंचाईवर मात आणि पूरस्थितीवर नियंत्रण या दुहेरी उद्देशाने राबवली जाणारी ही योजना कोपरगाव तालुक्याच्या कृषी समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.


या कामाच्या शुभारंभ प्रसंगी माहेगाव देशमुखचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. आमदार आशुतोष काळे यांनी दाखवलेली तत्परता आणि आर्ट ऑफ लिव्हिंगच्या पुढाकारामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत काळे गटाचे दोन उमेदवार बिनविरोध

## पाचपैकी तीन जागांवर बिनविरोध निवड; दोन ठिकाणी निवडणूक प्रक्रिया सुरू

**कोपरगाव । वीरभूमी -**

तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या पाच जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी काही उमेदवारांनी माघार घेतल्याने तीन जागांवर बिनविरोध निवड झाली आहे. यामध्ये काळे गटाचे दोन तर कोल्हे गटाचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे, तर उर्वरित दोन जागांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.



कोपरगाव तालुक्यातील शिंगणापूर, धोत्रे, चांदेकसारे व देहगाव बोलका या ग्रामपंचायतींतील सदस्य पदांच्या एकूण पाच जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली होती. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी शिंगणापूर ग्रामपंचायतीत इतर उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यामुळे दोन जागांसाठी प्रत्येकी एकच अर्ज शिल्लक राहिला. त्यामुळे त्या ठिकाणी काळे व कोल्हे गटाचे प्रत्येकी एक उमेदवार बिनविरोध निवडून आले.

तसेच चांदेकसारे ग्रामपंचायत पोटनिवडणुकीतही इतर उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे काळे गटाचा एकमेव उमेदवार शिल्लक राहिला आणि तो बिनविरोध निवडून आला.

त्यामुळे एकूण पाच जागांपैकी काळे गटाचे दोन उमेदवार आणि कोल्हे गटाचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. तर धोत्रे व देहगाव बोलका येथे प्रत्येकी एका जागेसाठी निवडणूक होणार आहे.

# महापुरुषांचा विचार 'इम्पा'ने जपला : प्रा. खरसडे

## फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम । डॉ. भट्टड व डॉ. कथुरिया यांना जीवनगौरव

**श्रीगोंदा । वीरभूमी-**

इंडियन मेडिकल प्रोफेशनल असोसिएशन (इम्पा), दिल्ली या राष्ट्रीय संघटनेच्या श्रीगोंदा तालुका शाखेतर्फे नूतन कार्यकारिणी पदग्रहण समारंभ तसेच महात्मा जोतीराव फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

हा सोहळा १४ एप्रिल २०२६ रोजी काष्टी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. सकाळच्या सत्रात निमगाव खलू येथे शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला. दुपारी श्रीगोंदा कारखाना परिसरातील डॉ. पाखरे हॉस्पिटल येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सायंकाळी काष्टी येथे झालेल्या कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल इम्पा जीवनगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. दौंड येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड तसेच श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनचे ज्येष्ठ सदस्य व मार्गदर्शक डॉ. संजीव कथुरिया यांना हा सन्मान मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.



यावेळी प्रा. अजित खरसडे यांनी भारतीय व्यवस्थेतील महापुरुषांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन करत इम्पाच्या उपक्रमांचे कौतुक केले. इम्पा ही संघटना महापुरुषांच्या विचारधारेवर चालणारी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच भारत भूषण पुरस्कारप्राप्त डॉ. प्रविण बढे यांनी जीर्ण व्याधींवरील नैसर्गिक आरोग्य चिकित्सा व आयुर्वेदिक उपचार पद्धती याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात इम्पाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल कोकाटे, डॉ. राजेश पाखरे, दौंड मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. मुकुंद भोर, निमा संघटनेचे अध्यक्ष डॉ. विशाल मिसाळ, रोटरी क्लब ऑफ दौंडचे माजी अध्यक्ष डॉ. राजेश दाते, एसआरपीएफचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच श्रीगोंदा होमिओपॅथिक संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. सौ. मीनाक्षी मोटे यांचा आणि तेंग सुडो क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर निवड झाल्याबद्दल समर्थ राहिंज यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. मोहन लबडे यांनी भूषविले. इम्पा श्रीगोंदा शाखेचे गव्हर्नर डॉ. प्रमोद गायकवाड, अध्यक्ष डॉ. गणेश बारगळ पाटील, उपाध्यक्ष डॉ. किरण पवार, सचिव सागर ठवाळ, खजिनदार डॉ. विजय लाळगे, सहसचिव डॉ. सोनाली गदादे, सहखजिनदार डॉ. चैताली मखरे यांच्यासह सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या कार्यक्रमाला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आदिवासी अकोले तालुक्यात कुपोषण निर्मूलनासाठी सक्षम अधिकारी नेमा

## ग्राहक पंचायतचे निवेदन । ३८ तीव्र कुपोषित तर ३३८ मध्यम कुपोषित बालकांची नोंद

**अकोले । वीरभूमी-**

आदिवासी अकोले तालुक्यात 'सॅम' (तीव्र कुपोषित) व 'मॅम' (मध्यम कुपोषित) बालकांची संख्या वाढत असून दुर्धर आजारांनी ग्रस्त बालकांचे प्रमाणही चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, तसेच सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी ग्राहक पंचायत अकोलेतर्फे करण्यात आली आहे.

याबाबतचे निवेदन निवासी नायब तहसीलदार किसन लोहारे व पंचायत समितीचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी शिवराम डगळे यांना देण्यात आले. ही माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे, भाऊसाहेब आभाळे व राजेंद्र गवांदे यांनी दिली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अकोले व राजूर अंतर्गत कुपोषित बालकांचे सातत्याने सर्वेक्षण केले जाते. तालुका आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय अकोले येथील आरबीएसके पथकाद्वारे अंगणवाड्यांमध्ये बालकांची आरोग्य तपासणी केली जाते. वाड्या-वस्त्यांमध्ये सर्वेक्षण करून कमी वजन व कमी उंची असलेल्या बालकांचा शोध घेतला जातो.

कमी वजनाच्या बालकांना नाचणीपासून तयार केलेले आहारपदार्थ, गूळ, शेंगदाणे, लाडू, गावरान तूप, अमृत आहार, अंडी, केळी तसेच सूक्ष्म पोषणतत्त्वांनी युक्त आहार किट देण्यात येतात. त्याचबरोबर आवश्यक औषधोपचारही केले जातात.

पोषण अभियानांतर्गत पालक सभा, पोषण रॅली, महिला मेळावे, माता बैठका यांचे आयोजन केले जाते. पोषण महिना व पंधरवड्याद्वारे जनजागृतीही केली जाते. आदिवासी भागातील स्तनदा व गरोदर मातांना योग्य आहाराबाबत मार्गदर्शन अंगणवाड्यांमार्फत केले जाते.

असे असतानाही, केंद्र व राज्य शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च होऊनही कुपोषणाचे प्रमाण कमी होत नसल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे. अकोले व राजूर येथील बालविकास प्रकल्प अधिकारी पदे गेल्या एक ते दोन वर्षांपासून रिक्त असून प्रभारी अधिकाऱ्यांकडे कार्यभार आहे. त्यामुळे तातडीने सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

तालुक्यात सध्या ३८ बालके तीव्र कुपोषित, ३३८ बालके मध्यम कुपोषित गटातील असून १८ बालके दुर्धर आजारांनी ग्रस्त आहेत. कुपोषण कमी करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र शाखा अकोलेचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेणकर, सचिव राम रुद्रे, प्रा. डॉ. सुनील शिंदे, माधवराव तिटमे, भाऊसाहेब वाकचौरे, ड. दीपक शेटे, ड. राम भांगरे, सिताराम भांगरे पाटील, रामहरी तिकांडे, प्रमोद मंडलिक, भाऊसाहेब वाळूंज, रामदास पवार, अशोक उघडे, राजेंद्र गवांदे, मोहन मुंडे, अनंत घाणे, हरिभाऊ अस्वले, सुनील देशमुख, पांडुरंग पथवे, जालिंदर बोडके, किरण चौधरी, रामदास पांडे, दत्ता ताजणे, राजेंद्र लहामगे, संतोष मुतडक, गंगाराम धिंदळे, गणपत पिथळे, सुरेश गभाले, पांडुरंग खाडे, तुकाराम खाडे, ज्ञानेश्वर पुंडे, भाऊसाहेब गोर्डे, कैलास तळेकर, सुदाम मंडलिक आदींची नावे आहेत.

या निवेदनाच्या प्रती राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण तसेच महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, जिल्हा परिषद कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास), तहसीलदार अकोले, पंचायत समिती अकोले व गटविकास अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहेत.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## रामवाडीत बालगोपाळांसह भिमजयंती साजरी

**अहिल्यानगर । वीरभूमी –**
रामवाडी येथे कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहपूर्ण, परंतु साधेपणात साजरी करण्यात आली. समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देत साजऱ्या करण्यात आलेल्या या जयंतीने लक्ष वेधले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी उपस्थित नागरिकांनी जय भीमच्या घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. जयंतीनिमित्त लहान मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले, तसेच त्यांच्यात बाबासाहेबांच्या विचारांची बीजे रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमात बाबासाहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यांच्या समानता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित विचारांचे महत्त्व पटवून देण्यात आले. विशेष म्हणजे, डीजे आणि अनावश्यक खर्चाला फाटा देत, साध्या आणि विधायक पद्धतीने जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्थानिक नागरिक, महिला, युवक तसेच संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकास उडाणशिवे म्हणाले की, जयंती फक्त नाचण्यासाठी नाही, तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आहे. बाबासाहेबांनी आपल्याला दिलेले संविधान, शिक्षणाचा अधिकार आणि समानतेचा मार्ग हा प्रत्येकाने आचरणात आणणे गरजेचे आहे. या कार्यक्रमात अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी उपक्रम राबवले. कारण बाबासाहेबांनी नेहमीच शिक्षण, संघटन आणि संघर्ष यांचा संदेश दिला. त्याच विचारांनुसार आपण मुलांना खाऊ वाटप केले, त्यांना त्यांच्या विचारांची ओळख करून दिली हेच खरे बाबासाहेबांना अभिवादन असल्याचे त्यांनी सांगितले.

## तमाशा कलावंतांवर अमानुष हल्ल्याचा लोककलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समितीकडून

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे आयोजित करण्यात आलेल्या यात्रोत्सवात तमाशा कलावंतांवर झालेल्या अमानुष हल्ल्याचा राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समितीच्या वतीने निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी केली आहे. तसेच, कारवाई करण्यात विलंब झाल्यास संघटनेच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या तमाशा आणि लावणीसारख्या लोककलेवर गेल्या काही काळात वारंवार हल्ले होत असल्याचे चित्र दिसत आहे. वडगाव सावताळ येथील बनाईदेवी यात्रोत्सवात कलावंतांना मारहाण करण्यात आली, तसेच महिला कलाकारांशी विटंबनाही करण्यात आली. ही घटना अत्यंत संतापजनक असून, अशा प्रकारच्या घटना आता सातत्याने घडत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर १ एप्रिल रोजी संगमनेर तालुक्यातील पुणे-नाशिक महामार्गावरील वरूडी फाटा येथे एका वाहनचालकाने तमाशा फडाच्या गाड्यांना अडवून कलावंतांना बेदम मारहाण केली होती. या घटनेत आठ कलाकार जखमी झाले होते. त्याचप्रमाणे, काही महिन्यांपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील एका यात्रेत मद्यधुंद प्रेक्षकांनी स्टेजवर चढून महिला कलाकारांशी गैरवर्तन केल्याची घटना घडली होती. नगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात देखील कार्यक्रमादरम्यान पैशांच्या उधळणीवरून वाद निर्माण होऊन कलावंतांच्या वाद्यांची तोडफोड करण्यात आली होती. या घटनांची मालिका पाहता ग्रामीण भागात तमाशा फडांना सुरक्षित वातावरण मिळणे कठीण होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

# श्रीरामपुरात तीन महिन्यात डॉ. आंबेडकरांचा भव्य पुतळा उभा राहणार

### भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांचा श्रीरामपूरकरांना शब्द

**श्रीरामपूर । वीरभूमी –**
भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णआकृती पुतळा स्मारक समितीच्या वतीने 'समाज भूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.



कार्यक्रमात बोलताना डॉ. विखे पाटील यांनी श्रीरामपूरकरांना महत्त्वाची ग्वाही दिली. येत्या तीन महिन्यांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पूर्णआकृती पुतळा उभारण्यात येईल, असा शब्द त्यांनी दिला.

यावेळी त्यांनी स्मारकाच्या उभारणीवरून सुरू असलेल्या श्रेयवादावरही भाष्य केले. पुतळा उभारणीच्या कामावरून होत असलेल्या राजकारणाबद्दल नाराजी व्यक्त करत ते म्हणाले, यामध्ये कोणीही श्रेयासाठी लढू नये. समाज बांधवांसह आजी-माजी लोकप्रतिनिधींचे या स्मारक उभारणीत मोठे योगदान आहे. जे काम शिल्लक आहे, त्यात आमचा खारीचा वाटा असेल. निदान महामानवांना तरी राजकारणाच्या कक्षेबाहेर ठेवा, अशी विनंती त्यांनी केली.

श्रीरामपूरात उभारले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक हे केवळ पुतळा नसून, बाबासाहेबांप्रती असलेली आस्था दर्शवणारे असेल, असे त्यांनी सांगितले. हा पुतळा इतका देखणा आणि भव्य असेल की, श्रीरामपूरमधून जाणाऱ्या प्रत्येकाच्या मनात बाबासाहेबांबद्दलची निष्ठा अधिक दृढ होईल. बाबासाहेबांच्या कार्याला शोभेल असे स्मारक उभारणे हीच आमची प्राथमिकता आहे, असे ते म्हणाले.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावना व्यक्त करताना त्यांनी सांगितले, पुरस्कार लहान किंवा मोठा नसतो; देणाऱ्याचे मन महत्त्वाचे असते. मी येथे पुरस्कार घेण्यासाठी नाही, तर स्मारक समितीने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करण्यासाठी आलो आहे.

श्रीरामपूर येथे संपन्न झालेल्या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार सोहळ्यास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णआकृती पुतळा स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांसह भाजपचे उपजिल्हाध्यक्ष दीपक पटारे, भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, मा. नगराध्यक्ष संजय फंड, नाना शिंदे, पक्षप्रतोत वैशाली चव्हाण, नगरसेवक संजय गांगड,रवी पाटील, आशिष धनवटे, मनोज लबडे, तिलक डुंगरवाल, केतन खोरे, शरद नवले, डॉ शंकर मुठे, भीमराज बागुल, नगरसेवक सिद्धार्थ फंड, रुपेश हरकल आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अपघातग्रस्त विद्यार्थ्याच्या कुटुंबाला २१ हजारांची मदत करत

## मॉडर्न हायस्कूलच्या शिक्षकांनी जपली सामाजिक बांधिलकी

**अकोले । वीरभूमी–**
मॉडर्न हायस्कूलचा माजी विद्यार्थी शैलेंद्र पाटीलबा दराडे याचा काही दिवसांपूर्वी अपघातात दुःखद मृत्यू झाला. वडिलांच्या निधनाच्या दुसऱ्याच दिवशी त्याच्या मुलाची इयत्ता दहावीची बोर्ड परीक्षा असल्याने अत्यंत कठीण परिस्थिती निर्माण झाली होती.

या प्रसंगी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक सुधीर जोशी सर व ज्येष्ठ शिक्षक गणेश जोशी सर यांनी विद्यार्थ्याच्या घरी जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. तसेच विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी त्याला परीक्षेला पाठविण्याची विनंती केली. ग्रामस्थांनीही समजूत काढत संबंधित विद्यार्थ्याला परीक्षेला पाठविले.

दरम्यान, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. सुगाव, कुंभेफळ व रेडे परिसरातील ग्रामस्थांनी शैलेंद्र दराडे यांच्या उपचारासाठी लोकवर्गणीतून लाखो रुपये जमा केले होते. मात्र त्यांना वाचविण्यात यश आले नाही. जमा झालेली रक्कम कुटुंबीयांना देण्यात आली.

याचबरोबर मॉडर्न हायस्कूलमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सामाजिक बांधिलकी जपत शैलेंद्र यांच्या कुटुंबीयांना २१ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली. मुख्याध्यापिका श्रीमती कांबळे मॅडम, उपमुख्याध्यापक सुधीर जोशी, ज्येष्ठ शिक्षक गणेश जोशी, दिलीप झोळेकर, मीनानाथ खराटे तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी घरी जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

विद्यालयाच्या वतीने २१ हजार रुपयांचा धनादेश मुख्याध्यापिका श्रीमती कांबळे मॅडम, उपमुख्याध्यापक सुधीर जोशी व सहाय्यक सचिव योगेश देशमुख यांच्या हस्ते रेडे गावचे पोलीस पाटील माणिक पांडे, मधुकर शिंदे, खानापूरचे सरपंच भरत नवले, सुरेश साबळे व दत्तात्रेय बंदावणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या संवेदनशील उपक्रमाबद्दल समाजातून सर्वत्र कौतुक होत आहे.



## शिर्डीत 'सालबर्डी' चित्रपटाचे पोस्टर अनावरण

### भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची उपस्थिती



**शिर्डी । वीरभूमी–**
साईबाबांच्या पावन भूमीत आज शिर्डीत 'नेबूला फिल्म' निर्मित सालबर्डी या मराठी चित्रपटाचे पोस्टर अनावरण माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. चित्रपटाच्या प्रदर्शनपूर्वी आयोजित या कार्यक्रमाला दिग्दर्शक, निर्माता तसेच चित्रपटातील सर्व कलाकार उपस्थित होते.

या वेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, चित्रपटाचे निर्माता देवडे पाटील हे जिल्ह्याचे भूमिपुत्र असल्याने त्यांच्या आग्रहास्तव हा सोहळा शिर्डीत आयोजित करण्यात आला. सालबर्डी चित्रपटाची पार्श्वभूमी नेवासा तालुक्यातील चांदा येथे घडलेल्या बालहत्याकांडाशी संबंधित असून, समाजात वाढत चाललेल्या जादूटोणा आणि भोंदूगिरीविरोधात ठोस संदेश देणारा हा चित्रपट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

समाजात अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि जादूटोणा यांसारख्या प्रवृत्ती थांबवण्यासाठी जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. लोकांनी परमार्थावर आणि देवावर विश्वास ठेवावा, भोंदू बाबांच्या आहारी जाऊ नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मराठी चित्रपटसृष्टीला नेहमीच विखे पाटील परिवाराचा पाठिंबा राहिल्याचे नमूद करत त्यांनी सांगितले की, शिर्डी परिसरात आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मराठी कलाकारांना प्राधान्य देण्यात आले आहे. चला हवा येऊ द्या आणि अजय-अतुल यांच्या कार्यक्रमांचे उदाहरण देत त्यांनी मराठी कलावंतांच्या सन्मानासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले.

जिल्ह्यातील नागरिकांनी सालबर्डी हा चित्रपट आवर्जून पाहावा, मराठी चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन द्यावे आणि स्थानिक निर्मात्याला साथ द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी साईबाबांचे दर्शन घेऊन सालबर्डी चित्रपटाच्या टीमने पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद घेतला. यावेळी शिर्डी ग्रामस्थ व विखे पाटील परिवाराच्या वतीने दिग्दर्शक, निर्माता आणि कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

# कुकडी प्रकल्पाच्या पाणी वाटपाविरोधात वितरिका १३२ वरील शेतकऱ्यांचा एल्गार

### अन्यायकारक वितरणाचा आरोप । मागण्या न मानल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**श्रीगोंदा । वीरभूमी–**
कुकडी प्रकल्पातील वितरिका क्रमांक १३२ वरील पाणी वापर संस्थांनी पाणी वितरणातील कथित अन्यायकारक धोरणांविरोधात एकत्र येत एल्गार पुकारला आहे. अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे शेती धोक्यात आली असून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत असल्याचा आरोप संबंधित संस्थांनी पत्रकार परिषदेत केला.

संस्थांच्या म्हणण्यानुसार, कालव्यावरील पाण्याचे नियोजन योग्य पद्धतीने होत नसून काही भागांना जादा पाणी दिले जात आहे, तर काही भाग पूर्णपणे वंचित राहत आहेत. नियोजित वेळापत्रकाचे पालन न केल्यामुळे पिकांचे नुकसान होत असून शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

तसेच कालव्यावर अनधिकृत पाणी उचल, वळवण आणि पाण्याचा अपव्यय होत असल्याकडेही लक्ष वेधण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांकडून योग्य नियंत्रण न ठेवल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

यावेळी पाणी वापर संस्थांनी काही प्रमुख मागण्या मांडल्या. त्यामध्ये पाणी वितरणात पारदर्शकता आणणे, सर्व शेतकऱ्यांना समान व न्याय्य पाणी वाटप करणे, अनधिकृत पाणी वापरावर तात्काळ कारवाई करणे आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाई करणे यांचा समावेश आहे.



दरम्यान, या मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. वितरिका १३२ परिसरात पाणी प्रश्नावरून संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

### पारनेरमध्ये जल्लोष, श्रीगोंद्यात आक्रोश

कुकडी प्रकल्पाच्या पाणी वितरणात असमतोल दिसून येत आहे. श्रीगोंदा तालुक्यात पूर्ण दाबाने पाणी न मिळाल्यामुळे पिके धोक्यात आली असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. याउलट पारनेर तालुक्यात मुबलक पाणी मिळाल्याने अधिकाऱ्यांचा सत्कार करून जल्लोष साजरा केला जात आहे.

# नारीशक्ती वंदन विधेयकाला सर्वांनी समर्थन द्यावे

## आ. मोनिका राजळे । माणिकदौंडी येथील महा राजस्व समाधान शिबिरात महिलांच्या ३३% आरक्षणाचे महत्त्व स्पष्ट



**● पाथर्डी । वीरभूमी –**
आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाची तरतूद असलेले नारीशक्ती वंदन विधेयक विशेष अधिवेशनात सादर होणार असून देशाच्या इतिहासात या निर्णयाची नोंद होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेल्या या धाडसी निर्णयाला सर्वांचे समर्थन आवश्यक आहे. आगामी दोन दिवस देशाच्या सार्वजनिक जीवनाच्या दृष्टीने क्रांतिकारक ठरणार असून लोकसभेत विधेयक संमत होऊन संसद व विधानसभेतून राजकारभाराच्या प्रक्रियेत कर्तृत्व व क्षमता सिद्ध करण्याची महिलांना संधी मिळेल, असा विश्वास आमदार मोनिका राजळे यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील माणिकदौंडी येथे छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान शिबिराच्या प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमासाठी जमलेल्या नागरिकांना महिला आरक्षण विधेयकाचे महत्त्व स्पष्ट करत त्यांनी त्याच्या समर्थनार्थ विशिष्ट मोबाईल क्रमांकावर मिस्ड कॉल करण्याचे आवाहन केले. अत्यंत सहज व सोप्या शब्दांत त्यांनी नारीशक्ती सन्मान विधेयकाची माहिती देत उपस्थितांना प्रोत्साहित केले.

मुख्य उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी प्रसाद मते होते. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर, दिग्विजय पाटील, किशोर सानप, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी लीलावती सोलाट, आजिनाथ आंधळे महाराज, रंगनाथ महाराज चितळे, उद्योजक आजिनाथ आव्हाड, पंचायत समितीचे माजी गटनेते सुनील ओव्हळ, अंकुश चितळे आदी उपस्थित होते.

महसूल प्रशासन, आरोग्य विभाग, कृषी विभाग, पंचायत समिती अशा विविध विभागांच्या लाभार्थ्यांना कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच प्रलंबित प्रकरणे असलेल्या गरजू नागरिकांना मागणीनुसार कागदपत्रे देण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार राजळे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व एकनाथ शिंदे तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून राज्यात हे अभियान यशस्वीपणे राबवले जात आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनातील दप्तर दिरंगाईबाबतचा राग कमी होण्यास मदत होत आहे. जिल्ह्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान सुरू आहे.

सरकारी कामकाजाची विशिष्ट पद्धत असून कामे साखळीतून पुढे जातात; मात्र लाभार्थ्यांना तातडीची सेवा अपेक्षित असते. त्यामुळे अधिकारी व नागरिक यांच्यात विसंवाद निर्माण होतो. अशा शिबिरांमुळे शासन व प्रशासनाची प्रतिमा अधिक लोकाभिमुख बनत असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या वर्षभरात महसूल विभागाने गतिमान, अचूक व प्रभावी निर्णयांची सोप्या पद्धतीने अंमलबजावणी करून लोकांमध्ये आपुलकीची भावना निर्माण केली आहे. ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले आहे त्यांनी तातडीने काम पूर्ण करावे, अन्यथा घरकुल रद्द होऊन हक्क कायमचा संपेल, असा इशाराही त्यांनी दिला.

सध्या मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू असून सर्वेक्षणासाठी घरी येणाऱ्या प्रगणकांना आवश्यक माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. महिला आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. निर्णय व विकास प्रक्रियेत महिलांचे योगदान वाढत असल्याने सशक्त व विकसित समाजाची निर्मिती होईल, असेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी केले. सूत्रसंचालन पोलीस पाटील वसंत वाघमारे यांनी केले, तर आभार नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर यांनी मानले. मंडलाधिकारी माधुरी नामदे, तलाठी आरती गाडकर, हरिश्चंद्र नांगरे, कालीचरण मखरे, बबन क्षीरसागर व ओंकार भिंगारदिवे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

# मंथन व लक्ष्यवेध राज्यस्तरीय परीक्षेत पारनेरच्या चाटे किड्स स्कूलचा झेंडा फडकला

**● पारनेर । वीरभूमी –**
फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या 'लक्ष्यवेध' आणि 'मंथन' राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये पारनेर येथील चाटे किड्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाले.

मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत शाळेची विद्यार्थिनी कु. समृद्धी संदीप कावरे हिने राज्यात व जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण यश मिळवले आहे. तिच्या या कामगिरीमुळे तालुक्याचे नाव राज्यपातळीवर उजळले आहे.

उन्मेषा शेखर दुधाडे हिने केंद्रात प्रथम, जिल्ह्यात सहावा आणि राज्यात अकरावा क्रमांक मिळवला. श्रीशा विवेक ठुबे हिने केंद्रात तिसरा, जिल्ह्यात २६ वा आणि राज्यात ३१ वा क्रमांक मिळवला. ओवी संभाजी चत्तर हिने केंद्रात आठवा व राज्यात ३१ वा क्रमांक मिळवला. पियुष दत्तात्रय ठुबे याने केंद्रात प्रथम आणि राज्यात २२ वा क्रमांक मिळवला. सिराज सियाज राजे यानेही केंद्र व राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली.

लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेतही चाटे किड्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपली छाप पाडली आहे. श्रीशा विवेक ठुबे हिने जिल्ह्यात प्रथम आणि राज्यात सातवा क्रमांक मिळवून शाळेचा नावलौकिक वाढवला. तसेच उन्मेषा दुधाडे (राज्यस्तर २१), विराज चत्तर (राज्यस्तर २४), आराध्या खोसे (राज्यस्तर २७), ओवी चत्तर (राज्यस्तर ३४), मयुरी साठे (राज्यस्तर ४२), आरोही गुंड (राज्यस्तर ५०) आणि अथर्व कोरडे (राज्यस्तर ५४) या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाल्यास यश निश्चित मिळते. ग्रामीण भागातील विद्यार्थीही राज्यस्तरावर ठसा उमटवू शकतात, हे आमच्या विद्यार्थ्यांनी सिद्ध केले आहे, अशी प्रतिक्रिया संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. सादिक राजे यांनी दिली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना राणी औटी, नजमा राजे, प्रिया चौरे, स्वप्नाली हारदे, नलिनी मगर, शीतल गुंड, शोभा काळे व पूजा गायखे या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. सादिक राजे आणि विश्वस्त फहाद राजे यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# वसुंधरा अकॅडमीचा सीबीएसई दहावीचा उत्कृष्ट निकाल

## २३ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा अधिक गुण । क्रिशा शेवाळे प्रथम, यशराज शिंदे द्वितीय

**● अकोले । वीरभूमी –**
सीबीएसई बोर्डाच्या इयत्ता दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडमीने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. संस्थेच्या २३ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले, २५ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले, तर १९ विद्यार्थ्यांनी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले. या यशामुळे अकॅडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या परीक्षेत क्रिशा ऋषिराज शेवाळे हिने ९७.६% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. यशराज राजेश शिंदे (९७.४%) द्वितीय, तर तेजस्विनी अण्णासाहेब वलवे (९६.४%) तृतीय क्रमांकावर राहिली. पियुष सुनील वाडगे आणि सोहम सचिन नवले (९६.२%) यांनी चौथा क्रमांक, साईशा योगेश दराडे (९५.८%) पाचवा, सार्थक संदीप एखंडे व ओम शिवाजी बुरके (९५%) सहावा, आर्या नितीन चासकर (९४.२%) सातवा, प्रथमेश गोरखनाथ खेडकर व अनुष्का प्रशांत रासने (९३.६%) आठवा, अमन आयाझ खतिब व अथर्व राजेंद्र वाघचौरे (९३.४%) नववा, तर सिद्धेश शांताराम चौधरी (९३%) दहावा क्रमांकावर राहिले. तसेच अनुष्का वैजनाथ गावडे (९२.८%), वैष्णवी भागवत कानवडे (९२.४%), स्वेजल खंडू आवारी (९१.८%), ज्ञानेश्वरी मिलिंद आरोटे (९१.६%), राजनंदिनी दीपक शेटे (९१.२%), आदर्श नानासाहेब दातखिळे (९१.२%), गुंजन नारायण डोंगरे (९१%), ईश्वरी बाळासाहेब मालुंजकर (९१%) आणि सात्विक श्रीकांत नवले (९१%) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले.

विषयानुसारही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. इंग्रजी विषयात दोन विद्यार्थ्यांनी १०० गुण मिळवले असून एकूण ३७ विद्यार्थ्यांना ९० पेक्षा अधिक गुण मिळाले. हिंदी विषयात तीन विद्यार्थ्यांनी ९९ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला असून ३८ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण मिळवले. आयटी विषयात चार विद्यार्थ्यांनी १०० गुण मिळवले असून ४२ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण मिळवले. समाज अभ्यास विषयात दोन विद्यार्थ्यांनी ९८ गुण मिळवले असून ३१ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण मिळवले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले यांच्या हस्ते पार पडला. यावेळी कोषाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव प्राचार्य अल्फोन्सा डी., सचिव विक्रम नवले, उपप्राचार्य राधिका नवले उपस्थित होते.

अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव प्राचार्य अल्फोन्सा डी., सचिव विक्रम नवले, उपप्राचार्य राधिका नवले तसेच सर्व संचालक मंडळ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व मार्गदर्शक शिक्षक सुनील खताळ, वृषाली शेटे, सोनिया नवले, दर्शना अरदाड, मेघा भालेराव, रक्षा पांडे आणि सिद्धांत सावंत यांचे अभिनंदन केले.

## शिक्षण विभागातील अनागोंदी विरोधात

# आ. सत्यजीत तांबे यांचे बेमुदत धरणे आंदोलन

## २५ मेपासून बेमुदत आंदोलनाचा इशारा । शिक्षण आयुक्तांना पत्राद्वारे तातडीच्या उपाययोजनांची मागणी



**● श्रीगोंदा, कोपरगाव । वीरभूमी–**
राज्यातील शालेय शिक्षण विभागातील अंधाधुंदी, गोंधळ आणि प्रशासकीय अनागोंदीविरोधात आमदार सत्यजीत तांबे यांनी तीव्र भूमिका घेतली असून, तात्काळ ठोस उपाययोजना न झाल्यास २५ मे २०२६ पासून बेमुदत धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

यासंदर्भात त्यांनी राज्याच्या शिक्षण आयुक्तांना पत्र देत उत्तर महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेची गंभीर स्थिती अधोरेखित केली आहे. पत्रात नमूद केल्यानुसार नाशिक पदवीधर मतदारसंघातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक व अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये शिक्षण क्षेत्रातील परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. शिक्षक, विद्यार्थी, पालक, संस्थाचालक आणि प्रशासन यांच्यात परस्पर अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून संपूर्ण यंत्रणा दिशाहीन झाल्याचे चित्र असल्याचे त्यांनी नमूद केले.

एसीआयटी चौकशीच्या नावाखाली लहानसहान कामेही प्रलंबित ठेवली जात असल्याची टीका त्यांनी केली. तसेच शिक्षण विभागातील अनेक प्रश्न आर्थिक नसून दैनंदिन प्रशासकीय कामकाजाशी संबंधित असतानाही वारंवार अर्थसंकल्पाचे कारण पुढे केले जात असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

शिक्षकांवर जनगणना, मतदार नोंदणी, बीएलओसारख्या शासकीय कामांचा अतिरिक्त भार टाकला जात असल्यामुळे त्यांच्या अध्यापनाच्या मुख्य कार्यावर परिणाम होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणापेक्षा अहवाल, लेखापरीक्षण आणि पूरक कामांवर अधिक भर दिला जात असल्याची बाबही चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर शिक्षण आयुक्तांनी तात्काळ अंतर्गत बैठक घेऊन सर्व प्रश्नांचा सखोल आढावा घ्यावा, अशी मागणी तांबे यांनी केली आहे. तसेच उत्तर महाराष्ट्रातील सर्व संबंधित घटक – जिल्हा शिक्षण अधिकारी, उपसंचालक, शिक्षक संघटना, संस्थाचालक, विद्यार्थी व पालक प्रतिनिधी – यांच्या उपस्थितीत पुण्यात मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संयुक्त बैठक आयोजित करून प्रलंबित प्रश्नांवर ठोस व दीर्घकालीन निर्णय घ्यावेत, असेही त्यांनी सुचवले आहे.

या सर्व मुद्द्यांवर ठोस निर्णय न झाल्यास २५ मे २०२६ पासून शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल आणि प्रश्न निकाली निघेपर्यंत ते सुरूच ठेवले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

आंदोलन हे माझ्यासाठी नवीन नाही, असे सांगत तांबे यांनी वयाच्या १८व्या वर्षापासून विविध सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला असल्याचे नमूद केले. जुनी पेन्शन योजना, विनाअनुदानित शाळांना अनुदान यांसारख्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला असून, अधिवेशनातही शैक्षणिक मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेत अनेक प्रश्न मार्गी लावल्याचा दावा त्यांनी केला.

# नामस्मरणच कलियुगातून तारेल

## हरिशरण गिरी महाराज । शिंगवे येथे हरी हरेश्वर मंदिर वर्धापन दिन



**● कोपरगाव । वीरभूमी –**
सांसारिक मोह–माया आणि धन–दौलत नाशिवंत असून नामस्मरण हेच माणसाला अमरत्वाकडे नेणारे खरे साधन आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. गिरी महाराज यांनी केले.

तालुक्यातील शिंगवे येथे श्री हरी हरेश्वर मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित कीर्तन महोत्सवात ते बोलत होते.

नामस्मरणाचे महत्त्व स्पष्ट करताना ते पुढे म्हणाले की, सतत नामस्मरण केल्याने जन्म–मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळते आणि मनातील पाप–दोष नष्ट होतात. भक्ती करताना प्रामाणिक भाव आणि श्रद्धा आवश्यक असून केवळ औपचारिकतेने नव्हे, तर अंत:करणपूर्वक नामस्मरण केल्यास त्याचे खरे फळ मिळते.संतांनी ईश्वरप्राप्तीसाठी दूर जाण्याची गरज नसून घरबसल्या भक्ती करता येते, असा सोपा मार्ग दाखवून दिला आहे, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी हभप. अरुण महाराज, रामकृष्ण महाराज, माऊली महाराज, बाळकृष्ण महाराज व प्रकाश महाराज यांनी संगीत साथ दिली. तसेच आचार्य भगवान म. शास्त्री, गणेश म. शास्त्री, शिवाजी म. ठाकरे, श्रीकृष्ण म. लकारे, डी. पी. मोरे, बाबासाहेब लासुरे, विजय लासुरे, प्रकाश बाभूळके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन शिंगवे येथील तरुण मित्र मंडळ व बजरंग दलाच्या स्वयंसेवकांनी केले.